# डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ,लोणेरे

**Dr. Babasaheb Ambedkar Technological University, Lonere**

विद्याविहार, लोणेरे-रायगड ४०२१०३ (महाराष्ट्र) Vidyavihar,Lonere-Raigad 402103(Maharashtra)

Tel: (02140) 275142 | Student Helpline: 02140 - 275212

Website: www.dbatu.ac.in, E-mail: registrar@dbatu.ac.in


शैक्षणिक विभाग

क्रमांक : डॉ.बाआंतंवि/शै.वि./स्कॉलरशिप/२०२४-२५/1278

दिनांक : २१/०८/२०२४

## नोटीस

विषय :- शैक्षणिक वर्ष सन २०२४-२५ मधील शिष्यवृत्ती अर्जांबाबत.

उपरोक्त विषयान्वये विद्यापीठातील प्रवेशित प्रथम वर्ष, द्वितीय वर्ष, तृतीय वर्ष व चतुर्थ वर्षातील सर्व विद्यार्थ्यांना सुचित करण्यात येते की, शैक्षणिक वर्ष सन २०२४-२५ करीता ऑनलाईन सर्व प्रकारच्या शिष्यवृत्ती (राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती / डॉ पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना / मायनॉरिटी शिष्यवृत्ती / भारत सरकार शिष्यवृत्ती / फ्रिशीप शिष्यवृत्ती /वसतीगृह निर्वाहभत्ता व एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प योजना तसेच National Scholarship Portal /इतर शिष्यवृत्ती चे अर्ज www.mahadbtmahait.gov.in या वेबसाईटवर परिपूर्ण भरावे आणि भरलेले अर्ज दिनांक ३१/०३/२०२५ पर्यंत सादर करण्यात यावे. तसेच विद्यार्थ्यांनी वेळोवेळी वरील संकेतस्थळावरील अपडेट तपासावे जेणेकरुन विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहणार नाही. जे विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहिल्यास त्याची संपूर्णतः जबाबदारी त्या विद्यार्थ्याची राहील. तसेच त्या शिष्यवृत्ती धारक विद्यार्थीने संबंधित शैक्षणिक वर्षाची नियमानुसार पूर्ण फी भरावी लागेल याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी. शिष्यवृत्ती फलक खालीलप्रमाणे आहे:

शिष्यवृत्ती फलक

| अ.क्र. | शिष्यवृत्तीचे नाव | प्रवर्ग | उत्पन्न मर्यादा | संकेतस्थळ (वेबसाईट ) |
|---|---|---|---|---|
| १. | राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती व मायनॉरिटी | **Open Category Minority** (अल्पसंख्याक) **category (all)** | ८ लाख किंवा त्यापेक्षा कमी | **www.mahadbtmahait.gov.in** |
| २. | नॅशनल स्कॉलरशिप पोर्टल | **Open Category** | ८ लाख किंवा त्यापेक्षा कमी | **www.mahadbtmahait.gov.in** |
| ३. | भारत सरकार शिष्यवृत्ती (स्कॉलरशिप) | **Welfare Department SC/VJNT/OBC/SBC/SEBC/ Disability Post Matric Scholarship to above Class** | १.५ लाख किंवा त्यापेक्षा कमी | **www.mahadbtmahait.gov.in** |
| ४. | भारत सरकार फ्रिशीप शिष्यवृत्ती Social Welfare Deptt | **SC/VJNT/OBC/SBC/SEBC/ Disability Tuition Fees and Examination fees to above Class** | १.५ लाख किंवा त्यापेक्षा जास्त | **www.mahadbtmahait.gov.in** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५. | एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प शिष्यवृत्ती (स्कॉलरशिप) योजना<br>**Tribal Development Deptt** | **ST Category (Post Matric Scholarship Scheme) Govt of India** | २.५ लाख किंवा त्यापेक्षा कमी | **www.mahadbtmahait.gov.in** |
| ६. | एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प शिष्यवृत्ती (फ्री शिप) योजना | **ST Category ( Vocational Training fee reimbursement for the student belonging to Schedule Tribe Category)** | २.५ लाख किंवा त्यापेक्षा जास्त | **www.mahadbtmahait.gov.in** |

विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीचे अर्ज भरतांना विद्यार्थ्यांनी महत्वाच्या सुचना लक्षात घ्या :

**(www.mahadbtmahait.gov.in)** वेबसाईटवर अर्ज भरताना खालील गोष्टीची दक्षता घ्यावी :-

- विद्यार्थ्यांस स्कॉलरशिप व फ्रिशीप अर्ज भरण्यासाठी आधारकार्ड नंबर, मोबाईल नंबर व बँक खाते क्रमांक लिंक केलेले **NPCI** बंधनकारक आहे.
- सदर आधारकार्ड नंबर लिंक असलेले मोबाईल नंबर व बँक खाते कुठल्याही प्रकारे बंद होणार नाही किंवा बदलणार नाही याची काळजी घ्यावी, जर खाते बदल झाल्यास विद्यार्थ्यांस स्कॉलरशिप व फ्रिशीप मिळणार नाही याची विदयार्थ्यांनी नोंद घ्यावी.
- सदर स्कॉलरशिप व फ्रिशीप फॉर्म करिता विदयार्थ्यांचा स्वत:चा मोबाईल नंबर आधारकार्ड नंबर बँक खाते क्रमांक, ई- मेल आय डी आवश्यक आहे. पालकांचे मोबाईल नंबर, खाते क्रमांक किंवा सायबर कॅफेचे मोबाईल नंबर किंवा ई- मेल आय डी देण्यात येऊ नये.
- ऑनलाईन अर्ज भरताना सर्व मुळ कागदपत्रे **(Original Document)** स्कॅन व्दारे वेगवेगळी **pdf** करुन २५० के बी च्या साईज असलेली **pdf** ऑनलाईन पध्दतीने अपलोड करावी.
- विदयार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरताना अचुक माहिती भरावी तसेच कागदपत्रे अपलोड करताना सोबत दिलेल्या सुचनेप्रमाणे फक्त मुळ कागदपत्रे संकेतस्थळावर अपलोड करावी.

- **ऑनलाईन पध्दतीने भरलेला अर्ज महाविदयालयात जमा करताना खालील क्रमानुसार कागदपत्रे जोडून दयावीत.**

१. स्कॉलरशिप व फ्रिशीप अर्जाची प्रत

२. विद्यार्थ्याचे आधारकार्ड प्रत

३. ३१ मार्च २०२५ पर्यंत वैध असलेले तहसिलदार किंवा सेतु कार्यालयाने निर्गमित उत्पन्नाचा दाखला. **(Income Certificate)**

- ✓ ३१ मार्च २०२५ पर्यंत वैध असलेले तहसिलदार किंवा सेतु कार्यालयाने निर्गमित केलेला उत्पन्नाचा दाखला. (फॉर्म नंबर १६ चालणार नाही.)
- ✓ वडिल मृत असल्यास वडिलांचा मृत्युचा दाखला व आई/ पालक यांच्या उत्पन्नाचा दाखला.
- ✓ वडिल वेगळे रहात असल्यास आई/वडिलांचे घटस्पोटाचे कागदपत्रे व आई / पालक यांचा उत्पन्नाचा दाखला.

४. महाराष्ट्र राज्याचा रहिवासी दाखला (Age & Domicile Certificate) तहसिलदाराचा किंवा सेतु कार्यालयाने निर्गमित केलेले.

५. कॉलेजने दिलेले ॲडमिशन कन्फरमेशन लेटर( **Allotement Letter)** अपलोड करावे.

६. विदयार्थ्यांच्या जातीच्या दाखल्याची प्रत.

७. मागील शैक्षणिक वर्षाचे गुणपत्रक. ऑनलाईन अर्जामध्ये मागील वर्षाची ओरिजनल मार्कशीट **(I&II / III&IV / V&VI) Sem** एकत्रित **pdf** करून अपलोड करावे.

८. महाविदयालयातून प्राप्त केलेली प्रवेश पावतीची प्रत.

९. शाळा सोडल्याच्या दाखल्याची प्रत.

१०.रेशनकार्डची प्रत.

११.विदयार्थी वर्गात ७५ टक्के उपस्थिती अनिवार्य आहे.

१२.जातपडताळणी प्रमाणपत्राची प्रत

१३.शैक्षणिक खंड असल्यास खंड प्रमाणपत्र

१४.लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र

१५.डॉ. पंजाबराव देशमुख शिष्यवृत्ती साठी महाविद्यालयामध्ये वसतीगृहामध्ये राहणा-या विद्यार्थ्यांनी वसतीगृहाचा निवासी प्रमाणपत्र व तसेच वसतीगृहाच्या बाहेर राहाणा-या विद्यार्थ्यांनी रु.१००/- स्टॅप पेपरवरती घर मालकाचे ११ महिन्याचे करारपत्र (कोणत्या महिन्यापासून (दिनांक) ते कोणत्या महिन्यापर्यंत(दिनांक) लिहिणे गरजेचे आहे) अपलोड करणे.

१६.ज्या विद्यार्थ्यांचा जुना युजर आयडी असेल तर त्यांनी त्याच आयडीने अर्ज भरावा व हार्ड कॉपी शैक्षणिक विभागात न विसरता स्वतः किंवा हस्त/परहस्ते जमा करणे.

**फॉर्म भरण्याचा अंतिम दि. ३० मार्च २०२५ पर्यंत आहे याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**

सबब उपरोक्त शिष्यवृत्तीचे अर्ज भरताना विद्यार्थ्यांना काही अडचणी असल्यास विद्यापीठातील शैक्षणिक विभागाशी संपर्क साधावा.

ई मेल आय डी: **academicsection@dbatu.ac.in**

लोणेरे रायगड महाराष्ट्र

BBadal 17/9/24

शैक्षणिक विभाग
डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ
लोणेरे – रायगड.

प्रत माहितीसाठी :

१. सर्व विभागप्रमुख/ नियंत्रक यांच्यामार्फत विद्यार्थ्यांकरीता परिभ्रमणार्थ
२. सर्व विद्यार्थी
३. नोटीस बोर्ड (सुचना फलक)
४. वेबसाईटवर माहितीकरीता.